**[Time: 3 Hours]** **[ Marks:100]**

Please check whether you have got the right question paper.

N.B:
1. All questions are compulsory.
2. Figures to the right indicate full marks allotted to question.
3. Working notes should form the part of your answer.

Q.1 A) State whether the following statements are True or False: (Any 10) **10**

1) In LLP, books of accounts are maintained on accrual basis only.
2) Statutory Reserves are incorporated in the books of purchasing company under Capital Reserves.
3) In Partial underwriting, only 2 persons can underwrite the issue.
4) Company cannot become a member of LLP.
5) Purchase consideration is the amount to be payable to Equity shareholders, Preference shareholders and Debenture holders.
6) Unmarked applications are known as direct applications.
7) Unpaid calls are to be included under Assets in Statement of Affairs.
8) In amalgamation, payment to preference shareholders for unpaid dividend is to be included in purchase consideration.
9) The liquidator is not entitled to claim remuneration on cash balance unless otherwise given.
10) Exchange rate is the proportion between two currencies.
11) Designated partners are like directors of a company.
12) Discount on issue of shares is an example of accumulated loss.

Q.1 B) Match the following: (Any 10) **10**

| 'A' | 'B' |
|---|---|
| 1) Absorption | a) Excess of Net asset taken over |
| 2) Unmarked Applications | b) Stock |
| 3) Non Monetary Item | c) Net Asset Method |
| 4) Capital Reserve | d) Without any seal or stamp of underwriter |
| 5) Registration of LLP | e) Submitted to Official Liquidator |
| 6) Equity Share Capital | f) Appointed by Central Government |
| 7) Deficiency / Surplus A/c | g) List – H |
| 8) Statement of Affairs | h) AS – 11 |
| 9) Currency conversion | i) One or more liquidation, no formation |
| 10) Amalgamation Adjustment Reserve | j) Under LLP Act, 2008 |
| 11) Appointment of Official Liquidator | k) Reserve in the Balance Sheet of the purchasing company |
| 12) Purchase consideration | l) Own funds |
| | m) Transferor company |

Q.2 A) Marvel Ltd imported goods from Larson Ltd of Germany worth US $ 2,00,000 on 30th November, 2017 when the exchange rate was ₹69 per US $. The payment was made as follows: **07**

| Date | Amount | Exchange Rate per US $ |
|---|---|---|
| 12th November, 2017 | 1,00,000 | ₹ 68 |
| 17th December, 2017 | 50,000 | ₹ 70 |
| 25th January, 2018 | 50,000 | ₹ 67 |

Marvel Ltd closes its books on 31st March every year. On 31st March, 2018, the exchange rate was ₹ 68 per US $.

You are required to pass Journal Entries in the books of Marvel Ltd. for the year ended 31st March, 2018.

Q.2 B) MNC Ltd exported goods to ELC Ltd in Newyork worth $ 75,000 on 1st January, 2018 on which date the exchange rate of 1 US $ was ₹ 70. **08**

The amount was received from ELC Ltd in three equal installments on the following dates:

| Date | Exchange Rate per US $ (₹) |
|---|---|
| 15th January, 2018 | 69 |
| 10th February, 2018 | 71 |
| 25th April, 2018 | 68 |

MNC Ltd closes the books on 31st March every year. The rate of exchange on 31st March 2018 was ₹ 69 per US $

Pass Journal Entries in the books of MNC Ltd to record the above transactions.

**OR**

Q.2 Suresh Ltd exported goods to Happy Ltd from USA worth US $ 50,000 on 15th February 2017 when exchange rate was ₹ 65 per US $. **15**

The payment was received in installments as under:

| Date | Amount of Installment US $ | Exchange Rate per US $ |
|---|---|---|
| 10/01/17 | 10,000 (Advance) | ₹ 66 |
| 15/03/17 | 20,000 | ₹ 67 |
| 10/04/17 | 15,000 | ₹ 66 |
| 10/05/17 | 5,000 | ₹ 64 |

Suresh Ltd closes its books every year on 31st March. On 31st March 2017, the exchange rate was ₹ 68 per US $.

You are required to pass Journal Entries in the books of Suresh Ltd. for the year ended 31st March, 2017 and 31st March, 2018. Also prepare Foreign Exchange Fluctuation account in the books of Suresh Ltd.

Q.3 Sunil Ltd agreed to take over the business of Anil Ltd as on 31st March 2018. Following are the Balance Sheets of Anil Ltd and Sunil Ltd as on 31st March 2018. **15**

| Liabilities | Anil Ltd ₹ | Sunil Ltd ₹ | Assets | Anil Ltd ₹ | Sunil Ltd ₹ |
|---|---|---|---|---|---|
| Equity shares of ₹ 10 each | 9,00,000 | 13,00,000 | Fixed Assets | 5,95,000 | 8,50,000 |
| Profit & Loss A/c | 32,000 | 1,75,000 | Sundry Debtors | 2,00,000 | 3,40,000 |
| Export Profit Reserve | 20,000 | 30,000 | Stock | 2,40,000 | 4,90,000 |
| 8% Debentures | 1,50,000 | 2,00,000 | Bank Balance | 1,57,000 | 1,50,000 |
| Sundry Creditors | 90,000 | 1,25,000 | | | |
| **Total** | **11,92,000** | **18,30,000** | **Total** | **11,92,000** | **18,30,000** |



AAF42EE9EC33F1FE3925E1F4667FCBF6

Following are the terms and conditions:

1. Sunil Ltd issued 1,00,000 equity shares of ₹ 10 each at a premium of 10% for the equity shareholders of Anil Ltd and also paid them cash of ₹ 5 for every 3 shares held.
2. All the assets and liabilities of Anil Ltd are taken over at book value except Fixed Assets revalued at ₹ 6,70,000 and Sundry Debtors subject to 5% provision for Bad Debts.
3. Cost of absorption amounting to ₹ 5,000/- was paid by Anil Ltd.
4. The Debentures of Anil Ltd to be converted into equivalent number of 8% debentures of Sunil Ltd.

You are required to:

1. Calculate purchase consideration.
2. Prepare Ledger Accounts to close the books of Accounts of Anil Ltd.
3. Prepare Balance Sheet of Sunil Ltd after absorption.

**OR**

Q.3 A) Balance Sheet of Sameer Ltd as on 31st March 2018 is as follows : **08**

| **Liabilities** | **₹** | **Assets** | **₹** |
|---|---|---|---|
| Equity Shares of Rs. 100 each | 4,00,000 | Machinery | 4,90,000 |
| Profit & Loss A/c | 70,000 | Debtors | 70,000 |
| General Reserve | 60,000 | Stock | 80,000 |
| 10% Debentures | 1,00,000 | Bank | 20,000 |
| Creditors | 30,000 | | |
| **Total** | **6,60,000** | **Total** | **6,60,000** |

Mala Ltd took over all the assets and liabilities at book value except machinery valued at 10% above book value and stock at ₹ 60,000.

Purchase Consideration is to be satisfied by issue of 5,000 equity shares of ₹ 100 each and balance is paid in cash.

Calculate Purchase Consideration

Q.3 B) Following is the extracted information of Adarsh Ltd as on 31st March 2018. **07**

| | |
|---|---|
| 10,000 Equity shares of ₹ 100 each | 10,00,000 |
| 5,000 12% Preference shares of ₹ 100 each | 5,00,000 |
| Total Share Capital | ₹ 15,00,000 |

Sandip Ltd took over the business of Adarsh Ltd as on 31st March 2018 on following terms and conditions.

1. Preference shareholders of Adarsh Ltd have been issued 6,000 15% preference shares of ₹100 each at 8% premium.
2. Sandip Ltd issued 4 equity shares of ₹ 100 each at ₹ 110 for every 5 equity shares held by Adarsh Ltd and also paid cash of ₹ 10 per share for each share held.
3. Adarsh Ltd incurred cost of liquidation ₹ 10,000.

Calculate Purchase Consideration and write journal entry in the books of Sandip Ltd. for discharge of P.C.



AAF42EE9EC33F1FE3925E1F4667FCBF6

Q.4 Max Ltd has authorized capital of 1,00,000 equity shares of ₹ 10 each. Company issued 60,000 shares at a premium of ₹ 2 each. The entire issue was underwriten by Vicky, Ricky and Micky in the ratio of 5:3:2 respectively. **15**

Applications were received for 48,000 shares out of which marked applications were as follows:

Vicky - 24,000 Shares
Ricky - 8,550 Shares
Micky - 12,450 Shares

Underwriters are entitled to get 5% commission on issue price.

You are required to:

a) Find out the net liability of underwriters
b) Pass Journal Entries in the books of Max Ltd.

**OR**

Q.4 A, B, and C were partners sharing profits and losses as 3:2:2. The following is the Balance Sheet of A, B and C as on 31.03.2019 **15**

| **Liabilities** | **₹** | **Assets** | **₹** |
|---|---|---|---|
| Capitals: | | Land & Building | 1,44,000 |
| A 1,45,500 | | Machinery | 42,000 |
| B 87,000 | | Stock | 18,000 |
| C 37,500 | 2,70,000 | Bills Receivable | 36,000 |
| Creditors | 24,000 | Debtors | 54,000 |
| **Total** | **2,94,000** | **Total** | **2,94,000** |

The partners decided to convert the business into a LLP on 31st March, 2019 on the following terms.

1) LLP which consists of A, B and C as partners contributes ₹ 1,50,000 each.
2) The company took over all assets except stock, which was taken by A for ₹ 15,000 and assumed all the liabilities. It also agreed to pay ₹ 45,000 for goodwill.
3) The purchase consideration was paid in cash.

Prepare:

1) Realisation A/c
2) Partners Capital A/c
3) Cash A/c
4) Journal Entries in the books of LLP
5) Statements of Assets and Liabilities

Q.5 R and K were equal partners in a firm. Their Balance Sheet as on 31st March, 2019 is as follows : **15**

| **Liabilities** | **₹** | **Assets** | **₹** |
|---|---|---|---|
| Capital Accounts | | Building | 1,28,000 |
| R | 1,10,000 | Furniture | 12,000 |
| K | 40,000 | Debtors 32,000<br>Less: RDD 2,000 | 30,000 |
| Sundry Creditors | 50,000 | Stock | 36,000 |
| Loan on Mortgage | 20,000 | Cash | 14,000 |
| **Total** | **2,20,000** | **Total** | **2,20,000** |

On the above date, they converted their business into LLP on the following terms

1. To take over Debtors at Rs. 28,000, stock at ₹ 44,000, furniture at ₹ 8,000, Buildings at ₹ 1,40,000 and Goodwill at ₹ 44,000.
2. To take over Sundry Creditors from whom a discount of ₹4,000 would be earned.

3. To take over Mortgage Loan along with unrecorded interest of ₹ 2,000.
4. Dissolution expenses were ₹ 4,000.

Calculate
1) Statement of purchase consideration.
2) Open Realisation A/c, R and K's capital A/c and LLP's A/c in the books of firm.

**OR**

Q.5 A) Kailash Ltd went into voluntary liquidation on 1st January 2018, when their Balance Sheet was as follows: **08**

| Liabilities | ₹ | Assets | ₹ |
|---|---|---|---|
| Share Capital: | | Plant & Machinery | 7,00,000 |
| 50,000 Equity Shares of Rs. 10 each | 5,00,000 | Stock | 3,25,000 |
| 50,000 5% Preference Shares of Rs. 10 each | 5,00,000 | Debtors | 3,00,000 |
| 6% Debentures | 1,25,000 | Cash | 5,000 |
| Creditors | 2,62,500 | Profit & Loss A/c | 57,500 |
| **Total** | **13,87,500** | **Total** | **13,87,500** |

1) The liquidator realized the assets as follows:
   Plant & Machinery - ₹ 5,00,000
   Stock - ₹ 2,00,000
   Debtors - ₹ 2,50,000
2) The expenses of liquidation amounted to ₹ 9,750 and the liquidator's remuneration was agreed at 2% on amount of realization.
3) Preference Dividend was in arrears for one year and Debenture holder's claim was paid on 30th June 2018.

Prepare Liquidator's Final Statement of Account

Q.5 B) Krishna Ltd issued 5,00,000 Equity Shares of ₹ 10 each at par. 1,40,000 Equity Shares were issued to the promoters and balance shares were offered to public which was underwritten by Simi, Kimi and Timi in the proportion of 2/9; 3/9; 4/9. Firm underwriting was as follows: **07**

Simi - 10,000 shares
Kimi - 12,000 shares
Timi - 14,000 shares

Total subscription received was 2,77,600 shares including marked application and excluding firm underwriting. Marked applications were

Simi - 60,000 shares
Kimi - 70,000 shares
Timi - 90,000 shares

Compute the liability of underwriters assuming that the benefit of firm underwriting is given to underwriters.

Q.6 A) Discuss the procedure of calculation of Net Liability of the underwriters. **10**
B) Distinguish between Pooling of Interest Method and Purchase Method of Amalgamation. **10**

Q.6 Write short notes (**Any 4**) **20**
1) Liquidator's Final Statement of Account.
2) Limited Liability Partnership (LLP).
3) Monetary & Non-monetary items.
4) Conditional & Firm Underwriting.
5) Net Payment Method of Purchase Consideration.
6) Absorption of company.

**मराठी रूपांतर**

**(३ तास)** **गुण : १००**

**सुचना:**
1. **सर्व प्रश्न अनिवार्य आहेत**
2. **उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात**
3. **उत्तरासह टाचण आवश्यक असल्यास उत्तराचा भाग मानला जाईल.**
4. **इंग्रजी प्रश्न प्रमाण मानावेत.**

प्र.१ अ) खालील विधाने सत्य की असत्य ते सांगा. (**कोणतीही दहा**) १०

१. LLP मध्ये, खाते वह्या फक्त संचयी पध्दतीने ठेवल्या जातात.
२. खरेदी करणाऱ्या कंपनीच्या पुस्तकामध्ये, कायदेशीर निधीचा समावेश भांडवल निधीमध्ये होतो.
३. अपूर्ण अंडरराईटींगमध्ये, फक्त २ व्यक्तीच भागांचे अंडरराईटींग करू शकतात.
४. कंपनी ही LLP ची सदस्य होऊ शकत नाही.
५. खरेदीची किंमतीची रक्कम, समभागधारक, अग्रहक्क भागधारक व कर्जरोखेधारकांना देय असते.
६. चिन्हांकित नसणाऱ्या अर्जांना, प्रत्यक्ष अर्ज असेही म्हणतात.
७. व्यवहारांच्या पत्रकामध्ये (statement of affairs), अदत्त कॉलचा समावेश मालमत्तेमध्ये होतो.
८. एकत्रीकरणामध्ये, अग्रहक्क भागधारकांना अदा करण्यात येणारी अदत्त लाभांशाची रक्कम, खरेदी किंमतीमध्ये समाविष्ठ केली जाते.
९. स्पष्ट उल्लेख केल्याशिवाय, दिवाळे परिसमापकाला, रोख शिल्लक रक्कमेवर मानधनाचा दावा करता येत नाही.
१०. विनिमय दर हा दोन चलनांमधील प्रमाण असते.
११. नियुक्त भागीदार हे कंपनीच्या संचालकाप्रमाणे असतात.
१२. भागविक्रिवरील सूट हे साठवलेल्या तोटयाचे उदाहरण आहे.

प्र.१ ब) खालील जोड्या जुळवा **(कोणत्याही दहा)** १०

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | अधिग्रहण | अ. | ग्रहण केलेल्या निव्वळ मालमत्तेहून अतिरिक्त |
| २. | चिन्हांकित नसलेले अर्ज | ब. | माल साठा |
| ३. | अमौद्रिक वस्तू | क. | निव्वळ मालमत्ता पध्दत |
| ४. | भांडवल निधी | ड. | अंडरराईटरच्या कोणत्याही सील किंवा शिक्क्याशिवाय |
| ५. | LLP नोंदणी | इ. | अधिकृत दिवाळे परिसमापकास सादर |
| ६. | समभाग भांडवल | फ. | केंद्र सरकार |
| ७. | तूट/शिल्लक खाते | ग. | यादी – ह (H) |
| ८. | व्यवहारांचे पत्रक (statement of affairs ) | ह. | AS-11 |
| ९. | चलन रूपांतर | आय. | एक किंवा अधिक दिवाळे परिसमापन; नवी स्थापना नाही |
| १०. | एकत्रीकरण समायोजन निधी | ज. | LLP कायदा, २००८ नुसार |
| ११. | अधिकृत दिवाळे परिसमापकाची नियुक्ती | क. | खरेदी करणाऱ्या कंपनीच्या ताळेबंदातील निधी |
| १२. | खरेदी किंमत | ल. | स्वतःचे भांडवल |
| | | म. | हस्तांतरण करणारी कंपनी |



AAF42EE9EC33F1FE3925E1F4667FCBF6

प्र.२ अ) मार्व्हल लि.ने, लार्सन लि.या जर्मनी स्थित कंपनीकडून दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजी १ US $ = ₹ ६९ च्या विनिमय दराने US $ २,००,००० चा माल आयात केला. **०७**

देय रक्कम खालीलप्रमाणे अदा करण्यात आली:

| तारीख | रक्कम | विनिमय दर प्रत्येक US $ |
|---|---|---|
| १२ नोव्हेंबर,२०१७ | १,००,००० | ₹ ६८ |
| १७ डिसेंबर, २०१७ | ५०,००० | ₹ ७० |
| २५ जानेवारी, २०१८ | ५०,००० | ₹ ६७ |

मार्व्हल लि.दरवर्षी ३१ मार्च रोजी लेखावर्ष बंद करतात. दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीचा विनिमय दर १ US $ = ₹ ६८ होता.

वरील माहितीच्या आधारे, मार्व्हल लि. च्या पुस्तकामध्ये दि. ३१ मार्च २०१८ रोजीच्या नोंदी करा.

ब) एम.एन.सी लि ने, ई.एल.सी लि. या न्यूयॉर्क स्थित कंपनीला दि. १ जानेवारी २०१८ रोजी US $ ७५,००० चा माल १ US $ ₹ ७० विनिमय दराने माल निर्यात केला. **०८**

ई.एल.सी कडून तीन हफ्त्यांमध्ये खालील तारखांना पैसे मिळाले :

| तारीख | विनिमय दर प्रत्येक US $ |
|---|---|
| १५ जानेवारी, २०१८ | ₹ ६९ |
| १० फेब्रुवारी, २०१८ | ₹ ७१ |
| २५ एप्रिल, २०१८ | ₹ ६८ |

एम.एन.सी. लि. दरवर्षी लेखावर्ष ३१ मार्चला बंद करते. दि. ३१ मार्च २०१८ चा विनिमय दर १ US $ ₹६९ होता. एम.एन.सी च्या पुस्तकात वरील व्यवहारांच्या नोंदी करा .

**किंवा**

प्र.२ सुरेश लि.ने हॅपी लि. या USA स्थित कंपनीला १ US $ ₹६५ च्या विनिमय दराने US $ ५०,००० चा माल दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्यात केला. देय रक्कम हफ्त्यांमध्ये खालीलप्रमाणे मिळाली: **१५**

| तारीख | हफ्त्यांमधील रक्कम US $ | विनिमय दर प्रत्येक US $ |
|---|---|---|
| १० जानेवारी, २०१७ | १०,००० (आगाऊ रक्कम) | ₹ ६६ |
| १५ मार्च, २०१७ | २०,००० | ₹ ६७ |
| १० एप्रिल, २०१७ | १५,००० | ₹ ६६ |
| १० मे, २०१७ | ५,००० | ₹ ६४ |

सुरेश लि. दरवर्षी ३१ मार्चला लेखावर्ष बंद करतात दि. ३१ मार्च २०१७ रोजीचा विनिमय दर ₹६८ प्रति US $ होता.

वरील माहितीच्या आधारे, सुरेश लि. च्या पुस्तकात दि. ३१ मार्च २०१७ व ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी आवश्यक नोंदी करा. तसेच सुरेश लि. च्या पुस्तकात परकीय चलन चढउतार खाते तयार करा.

प्र.३ सुनिल लि. ने अनिल लि. चा व्यवसाय घेण्याचे दि.३१ मार्च २०१८ रोजी ठरविले. **१५**

दि.३१ मार्च २०१८ रोजीचा अनिल लि. व सुनिल लि. यांचे ताळेबंद खालीलप्रमाणे :

| देयता | अनिल लि. ₹ | सुनिल लि. ₹ | मालमत्ता | अनिल लि. ₹ | सुनिल लि. ₹ |
|---|---|---|---|---|---|
| समभाग प्रत्येकी ₹१० चे | ९,००,००० | १३,००,००० | स्थिर मालमत्ता | ५,९५,००० | ८,५०,००० |
| नफा व तोटा खाते | ३२,००० | १,७५,००० | ऋणको | २,००,००० | ३,४०,००० |
| निर्यात नफा निधी | २०,००० | ३०,००० | मालसाठा | २,४०,००० | ४,९०,००० |
| ८% कर्जरोखे | १,५०,००० | २,००,००० | बँक शिल्लक | १,५७,००० | १,५०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | ९०,००० | १,२५,००० | | | |
| **एकूण** | **११,९२,०००** | **१८,३०,०००** | **एकूण** | **११,९२,०००** | **१८,३०,०००** |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) सुनिल लि.ने अनिल लि.च्या समभागधारकांना प्रत्येकी ₹ १० चे १,००,००० समभाग १०% प्रव्याजाने निर्गमित केले आणि त्यांना प्रत्येक ३ समभागांसाठी ₹ ५ रोखीने दिले.

२) अनिल लि. ची सर्व मालमत्ता व देणी पुस्तकी मूल्याने घेतली आहे. परंतु खालील मालमत्तेचे पुर्नमूल्य पुढीलप्रमाणे :
स्थिर मालमत्ता ₹ ६,७०,००० आणि विविध ऋणकोवर ५% बुडीत कर्जासाठी तरतूद केलेली आहे.

३) अधिग्रहण खर्च ₹ ५,००० अनिल लि. ने अदा केला.

४) अनिल लि. च्या कर्जरोख्यांना सुनिल लि. च्या ८% कर्जरोख्यांमध्ये समतुल्य संख्येत रूपांतरित केले.
वरील माहितीच्या आधारे :
१. खरेदी किंमतीची गणना करा.
२. अनिल लि. चे खाते पुस्तक बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.
३. अधिग्रहणानंतरचा सुनिल लि.चा ताळेबंद तयार करा.

**किंवा**

प्र.३ अ) दि. ३१ मार्च, २०१८ रोजी समीर लि. चा ताळेबंद खालीलप्रमाणे : ०८

| देयता | ₹ | मालमत्ता | ₹ |
|---|---|---|---|
| समभाग प्रत्येकी ₹ १०० चे | ४,००,००० | यंत्र | ४,९०,००० |
| नफा व तोटा खाते | ७०,००० | ऋणको | ७०,००० |
| सामान्य निधी | ६०,००० | मालसाठा | ८०,०००० |
| १०% कर्जरोखे | १,००,००० | बँक | २०,००० |
| धनको | ३०,००० | | |
| **एकूण** | **६,६०,०००** | **एकूण** | **६,६०,०००** |

माला लि. ने सर्व मालमत्ता व देणी पुस्तकी मूल्याने घेतली. परंतु यंत्रे पुस्तकी मूल्याहून १०% अधिक मूल्याने व मालसाठा ₹ ६०,००० ने घेतला.

खरेदी किंमतीचे वाटप, प्रत्येकी ₹१०० चे ५,००० समभाग देऊन केले आणि उर्वरित किंमत रोखीने दिली. खरेदी किंमतीची गणना करा.

प्र.३ ब) दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीची आदर्श लि. च्या पुस्तकातून घेतलेली माहिती खालीलप्रमाणे : ०७

| | |
|---|---|
| १०,००० समभाग प्रत्येकी १०० चे | ₹ १०,००,००० |
| ५,००० १२% अग्रहक्क भाग प्रत्येकी ₹१०० चे | ₹ ५,००,००० |
| एकूण भाग भांडवल | **₹ १५,००,०००** |

संदीप लि.ने दि. ३१ मार्च २०१८ रोजी आदर्श लि. चा व्यवसाय खालील अटी व शर्तींवर घेतला:

१. आदर्श लि. च्या अग्रहक्क भागधारकांना ६,००० १५% अग्रहक्क भाग ₹१०० प्रत्येकी ८% प्रव्याजाने दिले. संदीप लि. ने आदर्श लि. च्या भागधारकांना प्रत्येक ५ समभागांना, नवीन ४ समभाग प्रत्येकी ₹१०० चे ₹११० ला निर्गमित केले तसेच प्रत्येक समभागास ₹१० रोखीने दिले.

२. आदर्श लि. चा दिवाळे परिसमापनाचा खर्च ₹ १०,००० आला.
खरेदी किंमतीची गणना करा व संदीप लि. च्या पुस्तकात, खरेदी किंमत चुकती (Discharge) करण्याची नोंद करा.

प्र.४ अ) मॅक्स लि.चे १,००,०० समभागांचे प्रत्येकी ₹१० चे अधिकृत भांडवल आहे. कंपनीने ६०,००० भाग प्रत्येकी ₹२ प्रव्याजाने निर्गमित केले. संपूर्ण निर्गमन विकी, रिकी व मिकी यांनी अनुक्रमे ५:३:२ या गुणोत्तराने अंडरराईट केले होते. ४८,००० भागांचे अर्ज आले होते. त्यापैकी खालील अर्ज चिन्हांकीत केलेले होते: १५

| | | |
|---|---|---|
| विकी – | २४,००० | भाग |
| रिकी – | ८,५५० | भाग |
| मिकी – | १२,४५० | भाग |

निर्गमित किंमतीवर, अंडरराईटर्सना ५% कमिशन दिले जाईल.
वरील माहितीच्या आधारे,

अ) अंडरराईटर्सची निव्वळ देयता सांगा.
ब) मॅक्स लि. च्या पुस्तकामध्ये नोंदी करा.

**किंवा**

प्र.४ अ,ब,क हे भागीदार नफा व तोटा ३:२:२ या प्रमाणात वाटून घेतात. १५

दिनांक ३१ मार्च २०१९ रोजीचा अ,ब व क चा ताळेबंद खालीलप्रमाणे :

| देयता | ₹ | मालमत्ता | ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल | | जमीन व इमारत | १,४४,००० |
| अ १,४५,५०० | | यंत्र | ४२,००० |
| ब ८७,००० | | मालसाठा | १८,००० |
| क ३७,५०० | २,७०,००० | येणे हुंडी | ३६,००० |
| धनको | २४,००० | ऋणको | ५४,००० |
| **एकूण** | **२,९४,०००** | **एकूण** | **२,९४,०००** |

दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी भागीदारांनी व्यवसायाचे रूपांतर LLP मध्ये करण्याचे खालील अटींवर ठरविले:

१. LLP मध्ये अ,ब व क हे भागीदार असून प्रत्येकाने ₹१,५०,००० आणले.
२. कंपनीने सर्व मालमत्ता घेतली परंतु मालसाठा भागीदार 'अ' ₹१५,००० ना घेऊन गेला. कंपनीने सर्व देयताही घेतल्या. कंपनीने नावलौकिकासाठी ₹४५,००० अदा करण्याचे ठरविले.
३. खरेदी किंमत रोखीमध्ये अदा केली.

वरील माहितीच्या आधारे, खालील गोष्टी करा :

१) रियलाझेशन खाते
२) भागीदाराचे भांडवल खाते
३) रोख खाते
४) LLP च्या पुस्तकामध्ये नोंदी
५) मालमत्ता व देयतेचे पत्रक

प्र.५ R व K संस्थेतील समान भागीदार आहेत त्यांचा दि. ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे : १५

| देयता | ₹ | मालमत्ता | ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते | | इमारत | १,२८,००० |
| R | १,१०,००० | फर्निचर | १२,००० |
| K | ४०,००० | ऋणको ३२,०००<br>(–) बुडीत तरतूद २,००० | ३०,००० |
| | | मालसाठा | ३६,००० |
| विविध धनको | ५०,००० | रोख | १४,००० |
| तारण कर्ज | २०,००० | | |
| **एकूण** | **२,२०,०००** | **एकूण** | **२,२०,०००** |

वरील दिवशी, खालील अटींवर त्यांनी LLP मध्ये रूपांतरण केले :

१) ऋणको ₹२८,००० मालसाठा ₹४४,००० फर्निचर ₹८००० इमारत ₹१,४०,००० ला घेतली व नावलौकिक ₹४४,००० ठरले.

२) ₹ ४,००० ची सूट घेऊन विविध धनकोंना घेतले.

३) तारण कर्ज, अलिखित व देय व्याज ₹२,००० सह घेतले.

४) विसर्जन खर्च ₹४,००० दिला.

वरील माहितीच्या आधारे :

१. खरेदी किंमतीची गणना व पत्रक करा.

२. संस्थेच्या पुस्तकामध्ये, रियलाझेशन खाते, R व K चे भांडवल खाते आणि LLP खाते तयार करा.

**किंवा**

प्र.५ अ) दिनांक १ जानेवारी २०१८ रोजी कैलाश लि. ने ऐच्छिक दिवाळे परिसमापन केले. त्यावेळेचा ताळेबंद खालीलप्रमाणे : ०८

| देयता | ₹ | मालमत्ता | ₹ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल ५०,००० समभाग प्रत्येकी १० चे | ५,००,००० | सयंत्रे व यंत्र | ७,००,००० |
| ५०,०००, ५% अग्रहक्क भाग प्रत्येकी १० चे | ५,००,००० | मालसाठा | ३,२५,००० |
| ६% कर्जरोखे | १,२५,००० | ऋणको | ३,००,००० |
| धनको | २,६२,५०० | रोख | ५,००० |
| | | नफा व तोटा खाते | ५७,५०० |
| **एकूण** | **१३,८७,५००** | **एकूण** | **१३,८७,५००** |

१. दिवाळे परिसमापकाने खालीलप्रकारे मालमत्तेची वसूली केली :

सयंत्रे व यंत्रे – ₹ ५,००,०००

मालसाठा – ₹ २,००,०००

ऋणको – ₹ २,५०,०००

२. दिवाळे परिसमापनाचा खर्च ₹९,७५० आला आणि त्यांचे मानधन, वसूल केलेल्या रक्कमेच्या २% देण्याचे ठरविले.

३. अग्रहक्क भागांचा लाभांश एका वर्षासाठी थकित आहे आणि कर्जरोखेधारकांचा दावा दि. ३० जून २०१८ रोजी अदा केला.

दिवाळे परिसमापकाचे अंतिम खातेपत्रक तयार करा. (Liquidator’s final statements of accounts)

प्र.५ ब) कृष्णा लि. ने ५,००,००० समभाग प्रत्येकी ₹ १० मूळ किंमतीचे निर्गमित केले. १,४०,००० समभाग प्रवर्तकांना निर्गमित केले आणि उर्वरित भाग जनतेला ऑफर करण्यात आले जे सिमी, किमी आणि टिमीने २/९ : ३/९ : ४/९ या प्रमाणात अंडरराईट केले. ०७

निश्चित अंडरराईटींग खालीलप्रमाणे आहे :

सिमी – १०,००० भाग

किमी – १२,००० भाग

टिमी – १४,००० भाग

एकूण सदस्यत्वासाठी २,७७,६०० भागांचे अर्ज आले. (चिन्हांकित अर्जांचा समावेश करुन आणि निश्चित अंडरराईटिंग वगळून)



AAF42EE9EC33F1FE3925E1F4667FCBF6

चिन्हांकित अर्ज खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| सिमी | – | ६०,००० | भाग |
| किमी | – | ७०,००० | भाग |
| टिमी | – | ९०,००० | भाग |

निश्चित अंडरराईटिंगचा फायदा, अंडरराईटर्सना दिला जाईल असे गृहित धरून अंडरराईटर्सची देयता गणना करून सांगा.

६. अ) अंडरराईटर्सच्या निव्वळ देयतेची गणना करण्याची पध्दत सांगा. १०

ब) एकत्रीकरणाच्या हितसंबंध (Pooling of Interest Method) गोळा करणे पध्दत व खरेदी पध्दत यातील फरक लिहा. १०

**किंवा**

प्र.६ थोडक्यात टीपा लिहा **(कोणत्याही चार)** २०

१. दिवाळे परिसमापकाचे अंतिम खातेपत्रक
२. मर्यादित देयता भागीदारी संस्था (LLP)
३. मौद्रिक व अमौद्रिक वस्तू
४. अटींचे व निश्चित अंडरराईटींग
५. खरेदी किंमतीची निव्वळ भरणा पध्दत (Net Payment)
६. कंपनीचे अधिग्रहण

---